# वसई - विरार शहर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा

ठराव क्र. ४ दिनांक. २३/०२/२०१५

प्रस्तावाचा विषय:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेसह अ व क अंदाजपत्रकाचे सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ चे मुळ अंर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकुर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मधील तरतुदीप्रमाणे सविस्तर विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने सन २०१४-१५ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणेसाठी, पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बजेटचे अंदाज व अंध अपंग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण 'अ' अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी / स्मार्ट सिटी / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव विचारात घेण्यास शिफारस केली आहे.

निर्णय :- पी बजेट, जेंण्डर बजेट व अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण 'अ' अथसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी / स्मार्ट सिटी / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाज व सन २०१५-१६ चा मुळ अंदाज तयार करताना मा.स्थायी समितीने दि.२३/०२/२०१५ ते दि. २५/०२/२०१५ या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

१) प्रस्तावाचे वाचन करताना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यात आले.

२) वृक्ष प्राधिकरणाचे शिफारशीनुसार सन २०१४-१५ साठी ₹ १३ कोटी ३५ लक्ष ३३ हजार व सन २०१५-१६ साठी ₹ १३ कोटी २८ लक्ष ५७ हजार महानगरपालिका अंशदान "अ" अंदाजपत्रकाकडून वर्ग करणेसह वृक्ष प्राधिकरणाचा अर्थसंकल्प मा. महासभेपुढे शिफारस करणेत आला.

३) कोणत्याही प्रकारचे नविन कर अथवा फी आकारणी तसेच प्रचलित कर आणि फी चे दरात कोणतीही वाढ न करता अर्थसंकल्प प्रस्तावित करणेत आला.

४)	मुदतीत मालमत्ता कर भरणाऱ्या सर्व मालमत्ता धारकांना व त्यांचे कुटुंबीयांना थेट अपघाती विमा संरक्षणाचा लाभ देण्याची शिफारस करुन ₹ ७५ लक्ष इतकी तरतुद करणेत आली. यासाठी आवश्यक स्वनिधी स्वतंत्र बचत खात्यामध्ये / मुदत ठेवीमध्ये ठेऊन जमा होणारे व्याज त्याच निधीखाती जमा करावे तसेच यामधून संबंधीतांच्या दाव्यांची प्रदाने करणेसह व्यवहार नियंत्रीत केले जावेत.

५)	मालमत्ता धारकांच्या मालमत्तांना महानगरपालिकेमार्फत विमा संरक्षण देणे क्लीष्ट व तांत्रीकदृष्ट्या अवघड असल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

६)	मालमत्ता कर व पाणीपट्टीवरील दंडनीय व्याज माफीसंदर्भाने अभय योजना व स्वयंमुल्य निर्धारण करुन मालमत्ता कर भरणेची योजना तात्काळ अंमलात आणण्याचे निर्देश देण्यात आले.

७)	सन २०१४-१५-१६ मध्ये ५ वर्षाचा मालमत्ता कर आगाऊ भरणाऱ्यांना १५% सुट देण्याची शिफारस करणेत आली.

८)	सन २०१५-१६ मध्ये ५ वर्षाची पाणीपट्टी आगाऊ भरणाऱ्यांना १५% सुट देण्याची शिफारस करणेत आली.

९)	पोलिस ठाण्यांना गरजेनुसार सुरक्षा रक्षक पुरविणे सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी मात्र सदरकामी पुरवण्यात येणाऱ्या सुरक्षा रक्षकांचा खर्च मागणी संबंधीत विभागाकडे नोंदवावी.

१०)	अपारंपारीक उर्जास्त्रोत निर्मीतीसाठी सन २०१५-१६ ची तरतुद ₹ ४० लक्ष ने वाढवून ₹ ५० लक्ष करणेत आली.

११)	विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे / केबल व्यवस्था / टायमर व्यवव्था सन २०१४-१५ ची तरतूद ₹ १ कोटीने वाढ करुन ₹ ५ कोटी इतकी करणेत आली.

१२)	उद्यान विकास सन २०१४-१५ ची तरतुद ₹ १ कोटी ६० लक्ष ने कमी करणेत आली

१३)	उद्यानासाठी इलेक्ट्रिक फीटींग खेळणी व म्युझीक सिस्टीम खरेदीची सन २०१५-१६ मध्ये तरतुद ₹ १ कोटी २० लक्ष ने वाढवणेत आली.

१४)	उद्यानामधील खेळणी क्रिडासाहित्य इत्यादी व्यवस्थेसाठी केंद्रीय दर मागवून पुरवठा आदेश प्रभाग स्तरावरुन देऊन तेथेच पुरवठा करुन घेण्याचे ठरविणेत आले. तद्वतच दुरुस्ती देखभाल ठेका व उद्यानाचे क्षेत्र जाहिरातीसाठी देण्याचा प्रस्तावित ठेका हे दोन्ही स्वतंत्र असावेत असे निर्देश देण्यात आले.

१५)	महिला बाल कल्याण योजना तरतुदी, ज्येष्ठ नागरीकांसाठीच्या तरतुदी, युवक कल्याण कार्यक्रमाच्या तरतुदी, रुग्णालय व्यवस्थापनाच्या तरतुदी, अंध, अपंगासाठीच्या तरतुदी, यामधून महिला बाल कल्याण समितीमार्फत अंमलबजावणी केली जाणार असलेल्या स्थायी समितीने शिफारस केलेल्या नविन योजनांसाठी खालील प्रमाणे तरतुदी करणेत आल्या.

I) कुष्टरोग बाधीत पुरुष रुग्णांना कुष्टरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गतच्या तरतुदीमधून ₹ १५ लक्ष तसेच कुष्टरोग बाधीत महिला व मुलींना महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत, उपचार व पोषण भत्ता देणेसाठी ₹ १५ लक्ष तरतुद सन २०१५-१६ मध्ये करणेत आली.

II) निराधार बालके व मुलींना महिला बाल कल्याण योजनेच्या तरतुदी अंतर्गत ₹ ३० लक्ष तसेच निराधार मुलांना महिला बाल कल्याण समितीमार्फत युवक कल्याण योजनेअंतर्गत ₹ ३० लक्ष इतकी तरतुद शैक्षणिक अर्थसहाय्य, उपजिवीकेसाठी अर्थसहाय्य व विवाहासाठी अर्थसहाय्य देणेकामी सन २०१५-१६ मध्ये करणेत आली.

III) अंध, अपंग, कर्णबधीर व मुकबधीर विद्यार्थ्यांना अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन महिला बाल कल्याण समितीमार्फत शैक्षणिक अर्थसहाय्य देणेसाठी सन २०१५-१६ मध्ये ₹ १५ लक्ष तरतुद करणेत आली.

IV) रुग्णालय व्यवस्थापनाच्या तरतुदीमधून एच. आय. व्ही. बाधीत कुटुंबास उदरनिर्वाह व उपचारासाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत अर्थसहाय्य देणेकामी सन २०१५-१६ मध्ये ₹ १५ लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

V) महिला बाल कल्याण समितीमार्फत मल्टी ड्रग रेजीस्टन्स व क्षयरोग बाधीत रुग्णांसाठी सहाय्यकारी विविध योजनांकरीता सन २०१५-१६ मध्ये ₹ ५० लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

VI) महिला बाल कल्याण योजनेच्या तरतुदीअंतर्गत एक मुलगी असताना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असता ₹ १५ हजार व दोन मुली असताना शस्त्रक्रिया केली असल्यास प्रत्येक मुलीसाठी ₹ ५ हजार इतके अनुदान त्या मुलीचे नावे १८ वर्ष कालावधीच्या मुदतठेव प्रमाणपत्राद्वारे वितरीत करणेकामी सन २०१५-१६ मध्ये ₹ ३० लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

VII) नवजात रुग्ण बालकांस आवश्यक सुविधा पुरविणेसाठी अर्थसहाय्य देणेकामी सन २०१५-१६ मध्ये ₹ ३० लक्ष तरतुद महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत करणेत आली.

VIII) महिला बाल कल्याण समितीमार्फत रुग्णालय व्यवस्थापनाच्या तरतुदी अंतर्गत कॅन्सरग्रस्तांसाठी सहाय्य देणेकामी ₹ ५० लक्ष इतकी तरतुद सन २०१५-१६ मध्ये करणेत आली.

IX) महिला बाल कल्याण योजनेच्या तरतुदी अंतर्गत अंगणवाड्यांसाठी वाढीव भाडे देणेकरीता सन २०१५-१६ मध्ये ₹ ५० लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

X) महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत महानगरपालिका रुग्णालयात नोंदणी केलेल्या गर्भवती महिलांसाठी व प्रसुत महिलांसाठी रुग्ण वाहिकेचा खर्च करणेकामी सन २०१५-१६ मध्ये ₹ २० लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

१६) संस्था अनुदानांतर्गत बालकांसाठी कार्य करणाऱ्या बाल भवन संस्थांना तसेच अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत गतीमंद व मतिमंदासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहनपर अनुदान देणेची शिफारस करणेत आली.

१७) विश्वस्त नोंदणीकृत रुग्णालय तसेच निराधार व निराश्रीत मुलींसाठी कार्य करणाऱ्या संस्था, गंथालये व इतर विश्वस्त नोंदणीकृत संस्थांना अनुदान सन २०१५-१६ ची तदतुद ₹ १ कोटी ने वाढ करणेत आली.

१८) विद्यार्थ्यांसाठी शाळा व अभ्यासिकांना साहित्य पुरविणे सन २०१४-१५ ची तरतुद ₹ ३० लक्ष ने कमी करुन सन २०१५-१६ मध्ये वर्ग करणेत आली.

१९) दहन व दफन भुमी विकास विषयक सन २०१४-१५ ची तरतुद ₹ १५ लक्ष सन २०१५-१६ मध्ये वर्ग करणेत आली.

२०) तलाव सुशोभिकरणाची सन २०१४-१५ ची तरतुद ₹ २० लक्ष ने कमी करुन सन २०१५-१६ मध्ये वर्ग करणेत आली.

२१) शैक्षणिक उपकरणे वह्या पुस्तके खेळणी खरेदीची ५% मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत केलेली सन २०१४-१५ ची तरतुद ₹ ५० लक्ष सन २०१५-१६ मध्ये वर्ग करणेत आली.

२२) वाचनालय विज उपकरणे, गंथालयाची इमारत व इतर देखभाल दुरुस्तीची सन २०१४-१५ व २०१५-१६ ची तरतुद प्रतिवर्षी ₹ २० लक्ष ने कमी करणेत आली.

२३) पुस्तके व ग्रंथ खरेदी सन २०१४-१५ ची तरतुद ₹ १० लक्ष ने कमी करुन सन २०१५-१६ मध्ये वर्ग करणेत आली.

२४) वाचनालय इमारत व्यवस्था सन २०१४-१५ ची तरतुद ₹ ५ लक्ष ने वाढ करणेत आली.

२५) युवक कल्याण योजनांसाठी सन २०१५-१६ ची तरतुद ₹ १ कोटी ने वाढविणेत आली.

२६) खेळ व संघ दत्तक घेणेची सन २०१४-१५ व सन २०१५-१६ ची तरतुद कमी करुन प्रतिवर्षी ₹ १ कोटी करणेत आली.

२७) महानगरपालिकेने ऑलींम्पीक दर्जाचा तरण तलाव व मैदान विकसीत केले असल्याने सहभागी स्पर्धकांचे निवासासाठी निवासी क्रिडा संकुल उपलब्ध करणेकामी ₹ १ कोटी ५० लक्ष व तरण तलाव येथे ४० फुटाचे जॉगींग ट्रॅक उपलब्ध करणेसाठी ₹ ५० लक्ष तसेच क्रीडा प्रबोधिनी स्थापना व व्यवस्थापनासाठी ₹ ५० लक्ष इतकी प्राथमिक तरतुद सन २०१५-१६ मध्ये करणेत आली.

२८) शाळा, कॉलेज, पेट्रोलपंप इत्यादी सार्वजनिक ठिकाणी प्रथमोपचार किट उपलब्ध करणेसाठी सन २०१५-१६ मध्ये ₹ १० लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

२९) वसईच्या सांस्कृतीक विकासासाठी ऐतिहासिक व सांस्कृतीक केंद्र उपलब्ध करण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक वस्तु संग्रहालय उपलब्ध करणेसह ऐतिहासिक मालमत्तांचे संवर्धन आणि विकासासाठी सन २०१५-१६ मध्ये ₹ २ कोटी ७० लक्ष वाढ करुन ₹ ३ कोटी इतकी प्राथमिक तरतुद करणेत आली.

३०) सन २०१४-१५ मध्ये आर्थिक सामाजिक सर्व्हेक्षणांतर्गत फेरीवाला सर्व्हेक्षण हाती घेतले असुन सन २०१५-१६ मध्ये फेरीवाला सर्व्हेक्षणासाठी स्वतंत्र ₹ २० लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

३१) स्थानिक संस्था कर संगणक दुरुस्तीची सन २०१४-१५ ची तरतूद ₹ १ लक्ष ५० हजार इतकी करणेत आली.

३२) बांधकाम विभाग भाडेतत्वावरील वाहन भाडे सन २०१४-१५ ची तरतूद ₹ ५० लक्ष इतकी करणेत आली.

३३) प्रशासकीय इमारत, आयुक्त निवास व महापौर निवास बांधकाम या शिर्षांतर्गत प्रशासकीय इमारतीसाठी सन २०१४-१५ ची तरतूद ₹ १८ लक्ष करणेत आली.

३४) राजीव आवास योजनेअंतर्गत ₹ २ कोटी ५० लक्ष अनुदान व ₹ १ कोटी २५ लक्ष लाभार्थी अंशदान यासह प्रतिवर्षी ₹ ५ कोटी इतकी प्राथमिक तरतूद करुन पाठपुरावा करणेची शिफारस करणेत आली.

३५) विकास निधी अंतर्गत अग्निशमन दल व्यवस्था सन २०१४-१५ ची तरतूद ₹ १ कोटी इतकी करणेत आली.

३६) रस्ता बांधकामे सन २०१५-१६ ची तरतूद ₹ ९५ लक्ष ने वाढ करुन ₹ ६२ कोटी ६९ लक्ष इतकी करणेत आली.

३७) तरण तलाव देखभाल दुरुस्ती तरतूद सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये प्रतिवर्षी ₹ ३ लक्ष ने वाढ करुन ₹ ८३ लक्ष करणेत आली.

३८) मालमत्ता कर ठेका आस्थापना तरतूद प्रतिवर्षी ₹ २ कोटी ५० लक्ष करणेत आली.

३९) अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच मा. स्थायी समितीने अंतीमत मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशिल अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असुन सदर अर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल.

उपरोक्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या सन २०१४-१५ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१५-१६ चे मुळ पी बजेट, जेंण्डर बजेट, अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण 'अ' अथसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना / स्मार्ट सिटी योजना / विशेष निधी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

(₹ लाखात)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन २०१४-१५ | मुळ अर्थसंकल्प सन २०१५-१६ |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | ५४९९०.५८ | २८३५८.७९ |
| **जमा रकमा** | १२५४२५.३८ | २०९६५३.४५ |
| **प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा** | **१८०४१५.९६** | **२३८०१२.२४** |
| वर्ग जमा रकमा | ४१६३०.४० | ४०७५६.९९ |
| **खर्च रकमा** | १५२०५७.१७ | २३४३५०.८१ |
| वर्ग खर्च रकमा | ४१६३०.४० | ४०७५६.९९ |
| अखेर शिल्लक | २८३५८.७९ | ३६६१.४३ |

सुचकाचे नाव :- श्री. उमेश नाईक
व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- श्री. वृंदेश पाटील
व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या :- प्रतिकुल संख्या :- तटस्थ संख्या:-

ठराव सर्वानुमते मंजूर

(संदेश लखुजी जाधव)
सभापती तथा पिठासीन प्राधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका